आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक  बातमीपत्र– संध्या ७.०० वाजता

८  जून  २०२३ – गुरुवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचं द्वैमासिक धोरण  जाहीर / धोरणात्मक दरांमधे  कोणताही बदल नाही
- प्राथमिक कृषी पतसंस्थांना प्रधानमंत्री किसान समृद्धी केंद्राच्या कक्षेत आणण्याचा केंद्र सरकारचा निर्णय
- कसोटी क्रिकेट विश्व चषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात ऑस्ट्रेलियाच्या, पहिल्या डावात ४६९ धावा /भारतातर्फे महंमद सिराजचे ४ बळी

  **आणि**
- नैऋत्य मोसमी पाऊस केरळात दाखल

**<><><><><>**

भारतीय रिझर्व्ह बँकेनं आज द्वैमासिक आर्थिक पतधोरण जाहीर केलं. यामध्ये रेपो दर सहा पूर्णांक पाच टक्यांवर कायम ठेवण्यात आला आहे. व्याज दरातही कोणताही बदल करण्यात आलेला नसल्याची माहिती, बँकेचे गव्हर्नर शक्तीकांत दास यांनी आज पत्रकार परिषदेत दिली. स्थायी ठेव सुविधा अर्थात एसडीएफ दर सहा पूर्णांक २५ शतांश टक्के कायम ठेवला आहे. आधीच्या सहा पूर्णांक ७५ शतांश टक्यांचा सीमांत स्थायी सुविधा आणि बँक दरात कोणताही बदल करण्यात आलेला नाही. प्राप्त मुल्यांकनानुसार २०२३-२४ मध्ये महागाई चार टक्क्यांच्या वर राहील तर सर्व घटकांचा विचार करुन चलनवाढ २०२३-२४ साठी पाच पूर्णांक एक

दशांश टक्के राहण्याचा अंदाज असल्याचं त्यांनी सांगितलं. आरबीआयनं दोन हजार रुपयांची नोट चलनातून परत घेतल्यानंतर मे च्या तिसऱ्या आठवड्यापासून चलनातील घट आणि सरकारी खर्चात वाढ यामुळे प्रणालीतली तरलता वाढली आहे. बँकांमध्ये मोठ्या प्रमाणावर दोन हजार रुपयांच्या नोटा जमा झाल्यामुळं या तरलतेत आणखी वाढ झाल्याचं ते म्हणाले. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या आर्थिक धोरण समितीची तीन दिवसीय बैठक गेल्या सहा जून पासून मुंबईत सुरू होती. त्यानंतर आज द्वैमासिक आर्थिक धोरण जाहीर करण्यात आलं. आरबीआयनं दोन हजार रुपयांची नोट चलनातून परत घेतल्यानंतर आर्थिक धोरण समितीची झालेली ही पहिलीच बैठक होती.

<><><><><>

नागरिकांनी २ हजार रुपये मूल्याच्या, सुमारे ५० टक्के नोटा बँकेत जमा केल्या किंवा बदलून घेतल्या आहेत, अशी माहिती रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर शक्तीकांत दास यांनी वार्ताहर परिषदेत दिली. सुमारे ३ लाख ६२ हजार कोटी नोटा चलनात होत्या, त्यापैकी १ लाख ८० हजार कोटी नोटा ग्राहकांनी जमा केल्या किंवा बदलून घेतल्या आहेत. यात बँकेत जमा झालेल्या नोटांचं प्रमाण ८५ टक्के आहे, असं त्यांनी सांगितलं. नोटा जमा करण्यासाठी किंवा बदलण्यासाठी बँकामधे गर्दी होत नाही, मात्र या अदलबदलीसाठी शेवटच्या दिवसापर्यंत थांबू नये, असं आवाहन त्यांनी नागरिकांना केलं.

नव्या मूल्याच्या नोटा सुरु करण्याचा बँकेचा विचार नसल्याचं दास यांनी स्पष्ट केलं. रिझर्व्ह बँकेचं डिजीटल चलन सुरु करण्यासाठी कोणतीही तारीख निश्चित केलेली नाही, असं रिझर्व्ह बँकेचे डेप्यूटी गव्हर्नर रबिशंकर यांनी यावेळे सांगितलं. याबाबत, पथदर्शी प्रकल्पातंर्गत जूनअखेपर्यंत १० लाख ग्राहकांबरोबर चाचणी होणं अपेक्षित आहे, असं ते म्हणाले.

<><><><>

प्राथमिक कृषी पतसंस्थांना प्रधानमंत्री किसान समृद्धी केंद्राच्या कक्षेत आणण्याचा निर्णय केंद्र सरकारनं घेतला आहे. नवी दिल्ली इथं केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा आणि रसायने आणि खते मंत्री मनसुख मांडविया यांच्यासोबत झालेल्या बैठकीमध्ये सहकार मंत्रालयानं आज महत्वाचे निर्णय घेतले, त्यावेळी या निर्णयाची घोषणा करण्यात आली. देशभरात सुमारे एक लाख प्राथमिक कृषी पत सहकारी संस्था आहेत. या प्राथमिक कृषी पतसंस्थांना सेंद्रिय खतांच्या विपणनाशी जोडलं जाणार आहे. खत विभागाच्या बाजार विकास सहाय्य योजनेंतर्गत, खत कंपन्या अंतिम उत्पादनाची विक्री करण्यासाठी लहान जैव-सेंद्रिय उत्पादकांसाठी एकत्रितरित्या काम करतील. प्राथमिक कृषी पतसंस्था खते आणि कीटकनाशकांच्या फवारणीसाठी ड्रोन उद्योजक म्हणूनही काम करू शकतील. या निर्णयांमुळे प्राथमिक कृषी पतसंस्थांचे उत्पन्न वाढेल, तसंच ग्रामीण भागात रोजगाराच्या संधी वाढतील असंही मंत्रालयानं सांगितलं आहे.

<><><><>

डीआरडीओ म्हणजेच संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेद्वारे जमिनीवरुन जमीनीवर मारा करणारं नवीन पिढी  क्षेपणास्त्र, अग्नि प्राईमची यशस्वी चाचणी करण्यात आली. डॉ. एपीजे अब्दुल कलाम, या ओदिशाच्या किनारपट्टीजवळील बेटावरून काल संध्याकाळी ही चाचणी करण्यात आली. या क्षेपणास्त्राचा पल्ला दोन हजार किलोमीटर पर्यंतचा आहे. हे क्षेपणास्त्र सर्व उद्दिष्ट पूर्ण करण्यांमध्ये यशस्वी झालं आहे. डीआरडीओ आणि स्ट्रॅटेजिक फोर्सेस कमांडच्या वरिष्ठ अधिका-यांनी या चाचणीचं निरिक्षण केलं. त्यामुळे या प्रणालीला सशस्त्र दलांमध्ये समाविष्ट करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी डीआरडीओ आणि सशस्त्र दलांच्या अधिकाऱ्यांचं अभिनंदन केलं. डीआरडीओचे अध्यक्ष डॉ. समीर कामत यांनी याच्याशी संबंधीत सर्व अधिकाऱ्यांच्या प्रयत्नांचं कौतुक केलं.

**<><><><><>**

नॅशनल हायस्पीड रेल कॉर्पोरेशन लिमिटेडनं मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन मार्गावरच्या बोगद्याच्या उभारणीसाठी आज ॲफकॉन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड या कंपनीसोबत करार केला. या कराराअंतर्गत मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन मार्गावरच्या २१ किलोमीटर लांबीच्या बोगद्याचं काम केलं जाईल, यात भारतातल्या पहिल्या समुद्राखालच्या ७ किलोमीटर लांबीच्या रेल्वे बोगद्याच्या बांधकामाचाही समावेश आहे. नॅशनल हायस्पीड रेल कॉर्पोरेशनचे व्यवस्थापकीय संचालक राजेंद्र प्रसाद यांनी ही माहिती दिली.

मुंबई-अहमदाबाद हाय स्पीड रेल कॉरिडॉरअंतर्गत या बोगद्याच्या निर्मितीचं काम सर्वात आव्हानात्मक असल्याचं प्रसाद यांनी सांगितलं. याअंतर्गत देशात पहिल्यांदाच  समुद्राखालून जाणारा दुहेरी रेल्वेमार्ग बांधला जाणार असून, हा मार्ग ७ किलोमीटर लांबीचा असल्याचं त्यांनी सांगितलं. या कामासाठी बोगदा खणण्यासाठीची तीन विषीष्ट यंत्र आणि ऑस्ट्रेलियातील बोगदा निर्मितीच्या नव्या तंत्रज्ञानाचा वापर केला जाणार असल्याची माहितीही त्यांनी दिली.

<><><><><>

दिवा शहरात 610 कोटी रुपयांच्या विविध विकास कामांचं भूमिपूजन तसंच लोकार्पण आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते झालं. दिव्यामध्ये स्वतंत्र पोलीस ठाण्याच्या इमारतीसाठी ५ कोटी रूपये देणार असल्याची घोषणाही मुख्यमंत्र्यांनी केली. ठाणे महानगरपालिकेच्या वतीनं दिवा शहरात समूह विकास योजना राबवली जात असून त्याबाबतची प्रक्रिया राबवण्याचे निर्देश त्यांनी महापालिका आयुक्तांना दिले.

<><><><><>

राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारला गेल्या महिन्यात नऊ वर्षे पूर्ण झाली. केंद्र सरकारनं राबवलेल्या उपक्रमांवर आकाशवाणी वृत्त विभागाद्वारे बातम्यांची विशेष मालिका सुरू केली जात आहे. आज आपण मातृवंदन योजने बद्दल जाणून घेऊया.

महिलांच्या शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक आणि राजकीय सक्षमीकरणासाठी सरकारने गेल्या काही वर्षांत अनेक योजनाबद्ध आणि कायदेविषयक योजना सुरू केल्या आहेत. त्यामुळे महिलांचा अनेक बाबतीत स्तर उंचावला आहे. केंद्र सरकारनं 1 जानेवारी 2017 ला प्रधानमंत्री मातृवंदन योजना सुरू केली. या योजने अंतर्गत गर्भवती, बाळंत महिलांचं आणि नवजात बालकांचं आरोग्य सुधारण्यासाठी आणि पोषण आहार मिळावा यासाठी आर्थिक मदत दिली जाते. आतापर्यंत 2 कोटी 79 लाख महिलांनी या योजनेचा लाभ घेतला आहे. या योजनेअंतर्गत आतापर्यंत 12 कोटी 241 लाख रुपये वितरीत करण्यात आले आहेत. या योजनेअंतर्गत पहिल्या दोन प्रसुतींसाठी आर्थिक मदत केली जाते. पण दुसरं बाळ मुलगी असणं बंधनकारक आहे. या पहिल्या योजने अंतर्गत प्रसुतीनंतर 5 हजार रुपये दोन टप्प्यात दिले जातात. दुसऱ्या प्रसुतीनंतर एकाच टप्प्यात 6 हजार रुपये दिले जातात. या योजनेमुळे भ्रुणहत्येला बऱ्याच प्रमाणात आळा बसला आहे. तसंच लिंग गुणोत्तरात सुधारणा झाली आहे.

**<><><><><>**

प्रसार भारतीच्या वतीनं आकाशवाणी मुंबई केंद्राच्या प्रादेशिक वृत्त विभागाअंतर्गत मुंबई, रत्नागिरी, परभणी, नांदेड, लातूर, बीड आणि सांगली या जिल्ह्यांसाठी कंत्राटी तत्वावर अर्धवेळ वार्ताहर नियुक्तीसाठी अर्ज मागवले आहेत. २४ ते ४५ वयोगटातले पात्र उमेदवार यासाठी आपले अर्ज सादर करू शकतील. यासाठीची पात्रता, अर्जाचा नमुना तसंच इतर माहिती प्रसार

भारती डॉट जीओव्ही डॉट इन स्लॅश पी बी व्हॅकेन्सिंज या दुव्यावर उपलब्ध आहे.  इच्छुकांना एअर न्यूज पॅनल ट्वेंटी ट्वेंटी टू ॲट जीमेल डॉट कॉम या ईमेल आयडीवर आपले अर्ज पाठवता येतील.

<><><><><>

कसोटी क्रिकेट विश्व चषक स्पर्धेत भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात कालपासून लंडनमधे सुरु झालेल्या अंतिम सामन्यात ऑस्ट्रेलियाचा पहिला डाव आज ४६९ धावांवर संपला. कालच्या तीन बाद ३२७ धावांवरुन ऑस्ट्रेलियानं आज पुढं खेळायला सुरुवात केल्यानंतर स्टीव्हन स्मिथनं शतक पूर्ण केलं. तो १२१ धावांवर बाद झाला. ट्रॅव्हीस हेडनं १६३ धावा केल्या. महंमद सिराजच्या चेंडूवर तो झेलबाद झाला. ॲलेक्स कॅरेनं ४८ धावा केल्या.

या डावात भारतातर्फे महंमद सिराजनं ४ गडी बाद केले. ठाकूर आणि शामीलं प्रत्येकी दोन, तर जडेजानं एक बळी मिळवला.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा भारताच्या पहिल्या डावात ३ षटकात बिन बाद  २२ धावा झाल्या होत्या.

<><><><><>

नैऋत्य मोसमी पाऊस दक्षिण अऱबी समुद्राच्या उर्वरित भागात पुढं सरकला असून, संपूर्ण लक्षद्वीप,  तसंच केरळ आणि दक्षिण तामिळनाडूच्या बहुतांश भागात पोचला आहे. सामान्यतः मान्सून केरळमधे १ जूनला पोचतो

मात्र यावेळी तो आठवडाभर उशिरानं, आज पोचला असल्याचं हवामान विभागाच्या प्रसिद्धी पत्रकात म्हटलं आहे.

गेल्या चोवीस तासात, केरळमधे बहुतांश भागात पाऊस पडला. येत्या दोन दिवसात मान्सून पुढं सरकत, केरळचा उर्वरित भाग, तामिळनाडू आणि कर्नाटकाच्या काही भागात तसंच नैऋत्येकडच्या आणखी काही भागात पोचेल. त्याचवेळी तो बंगालच्या उपसागराच्या मध्य आणि ईशान्य भागात तसंच ईशान्येकडच्या राज्यांच्या काही भागात पोचेल, असा अंदाज आहे.

<><><><><>

भारतीय रेल्वेनं मे २०२३ मध्ये मालवाहतूकीच्या माध्यमातून १४ हजार ६४१ कोटी रुपयांपेक्षा अधिक उत्पन्न मिळवलं. मागच्या वर्षीच्या मे महिन्याच्या तुलनेत उत्पनाचं हे प्रमाण ४ टक्क्यानं जास्त असल्याचं रेल्वेनं कळवलं आहे. रेल्वेनं २०२२च्या मे महिन्यात १४ हजार ८३ कोटी रुपयांचं उत्पन्न मिळवलं होतं. त्यावेळी मे महिन्यापर्यंत रेल्वेनं वर्षभरात १३१.५० मेट्रिक टन मालवाहतूक केली होती, त्यानंतर यावर्षीच्या मे महिन्यापर्यंत, वर्षभराच्या एकूण मालवाहतूकीत दोन टक्क्यानं वाढ होऊन ती, १३४ मेट्रिक टनापर्यंत पोचली अशी माहिती भारतीय रेल्वेनं दिली आहे.

<><><><><>

संतश्रेष्ठ निवृत्तीनाथ महाराज पालखीचा पहिला रिंगण सोहळा नाशिक जिल्ह्यात सिन्नर तालुक्यातल्या दातली इथं आज पार पडला. झालेला

रिंगण सोहळ्यात वारकऱ्यांसह सुमारे ३० ते ३५ हजार भाविक सहभागी झाले.

त्र्यंबकेश्वर इथून निघालेल्या संतश्रेष्ठ निवृत्तीनाथ महाराज पालखी सोहळ्याचा काल रात्री लोणारवाडी इथं मुक्काम झाला. त्यानंतर आज सकाळी सिन्नर शहरात पायी दिंडी सोहळ्याचे आगमन झाले. दुपारी दातली शिवारात रिंगण सोहळ्याचं आयोजन करण्यात आलं होतं.

<><><><><>

नाशिक जवळ एका कंटेनरनं धडक दिल्यानं सिद्धायिका श्रीजी आणि हर्षायिका श्रीजी या दोन जैन साध्वींचा मृत्यू झाला. नाशिक शहरातील सिडको इथल्या जैन स्थानकात येत्या दोन जुलैपासून सुरू होणाऱ्या चातुर्मास प्रवचनासाठी मुंबईहून त्या पायी येत होत्या. पहाटे साडेपाचच्या सुमारास कसारा घाटाजवळ एका हॉटेलसमोर त्यांना कंटेनरनं धडक दिली.

<><><><><>

ठाणे बनावट नोटा प्रकरणात मुंबईतल्या एनआयए विशेष न्यायालयानं काल दोन बांग्लादेशींना १० वर्षांच्या सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली. तसंच आरोपींना भारतीय दंड संहिता कलम ४८९ (क) , ४८९(ब) आणि यूए(पी) अंतर्गत प्रत्येकी १० हजार रूपयांचा दंड ठोठावला आहे. अब्दुल्ला शैखदार आणि नजमुल हसन हे आरोपी बांग्लादेश इथल्या खुलनाचे रहिवासी आहेत. या आरोपींनी ४ लाख ८ हजार किंमतीच्या बनावट नोटा बांग्लादेशातून महाराष्ट्रात आणल्या होत्या.

आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक  बातमीपत्र– संध्या ७.०० वाजता

८  जून  २०२३ – गुरुवार

**<><><><><>**

मुंबईत चर्नीरोड इथल्या सावित्रीबाई फुले मागासवर्गीय मुलींच्या वसतिगृहातल्या, एका मुलीवर बलात्कार करुन तिची हत्या केल्याच्या घटनेचा भारतीय रिपब्लिकन पक्षानं निषेध केला आहे. केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री आणि पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष रामदास आठवले उद्या या वसतीगृहाला भेट देवून माहिती घेतील अशी माहिती भारतीय रिपब्लिकन पक्षानं प्रसिद्धीपत्राद्वारे दिली आहे. ही गंभीर घटना असून याची सखोल चौकशी व्हायला हवी अशी मागणीही पक्षानं केली आहे.

**<><><><><>**

'सिडको'च्या कार्मिक विभागातील सहाय्यक कार्मिक अधिकारी सागर तपाडिया याला, २८ बोगस कर्मचाऱ्यांचा वेतन घोटाळा प्रकरणी  सीबीडी पोलिसांनी काल  अटक केली आहे. न्यायालयानं त्याला ५ दिवसांची पोलीस कोठडी दिली आहे.

तपाडियानं २०१७ ते एप्रिल २०२३ या कालावधीत दोन कोटी ८१ लाख ९३ हजार रुपयांचा अपहार केल्याचं आढळून आलं होतं. त्यानंतर सागर तपाडिया याच्या विरोधात सीबीडी पोलीस ठाण्यात फसवणुकीसह बनावटगिरी आणि अपहार केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला होता.

**<><><><><>**

छोट्या शेतकऱ्यांना शेतीच्या कामांसाठीचा खर्च परवडू शकेल, तसंच ही काम अधिक सुसह्य व्हावीत, यासाठी कृषी क्षेत्राच्या यांत्रिकीकरणात क्रांती होणं गरजेचं असल्याचं मत, महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांनी व्यक्त केलं आहे. अहमदनगरमधे राहुरी इथल्या महात्मा फुले कृषि विद्यापीठात आजपासून सातव्या पंचवार्षिक पुनरावलोकन समितीच्या बैठकीला सुरुवात झाली, त्यावेळी ते बोलत होते. शेत मजुरांच्या टंचाईमुळे पिक लागवडीतल्या प्रत्येक टप्प्यावरची कामं आव्हानात्मक झाली आहेत, त्यामुळे शेतकऱ्यांचं शहरांकडे स्थलांतर वाढू लागलं आहे, कृषी क्षेत्राच्या यांत्रिकीकरणामुळे या परिस्थितीत बदल होऊ शकेल असं ते म्हणाले.

या बैठकीत पंचवार्षिक पुनरावलोकन समितीच्या सदस्यांसह, राज्यातले तसंच राजस्थान आणि गुजरातमधल्या १४ प्रकल्पांचे प्रमुख संशोधक आणि शास्त्रज्ञही सहभागी झाले आहेत.

**<><><><><>**

जालना जिल्हा कृषी विभागानं दोन कृषीसेवा केंद्राचे परवाने रद्द केले आहेत, तसंच जिल्हाभरताल्या ३७ कृषीसेवा केंद्र चालकांना विक्री तात्पुरती बंद ठेवण्याचे आदेशही दिले आहेत. कापसाच्या काही वाणांच्या बियाण्यांची चढ्या दरानं विक्री होत असल्याचं तसंच, खरेदी आणि विक्रीच्या नोंदीत तफावत असल्याचं आढळल्यानं कारवाई केल्याचं जिल्हा कृषी अधिकारी गुणवंत कापसे यांनी सांगितलं. यासंदर्भात विभागाकडे तक्रारी आल्या होत्या,

त्यानंतर भरारी पथकांच्या माध्यमातूनही कारवाई सुरु केली आहे, तसंच कृषी विभागातल्या कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीतच वाणांची विक्री केली जात असल्याचं त्यांनी सांगितलं. शेतकऱ्यांनी बियाणांच्या विशिष्ट वाणाचा आग्रह धरू नये, असं आवाहनही त्यांनी केलं आहे.

<><><><><>

जनतेला गावातच आवश्यक सेवा आणि योजनांची माहिती आणि लाभ देण्यासाठी 'शासन आपल्या दारी' या उपक्रमांतर्गत यवतमाळ जिल्ह्यात ५ आणि ७ जून रोजी झालेल्या शिबिरामध्ये ४० हजार ३७६ लाभार्थ्यांना विविध प्रमाणपत्र वितरित करण्यात आली, तसंच योजनांचा लाभ देण्यात आला. या उपक्रमांतर्गत जिल्ह्यात ९० गावांमध्ये शिबिर आयोजित करण्यात आलं होतं.

<><><><><>

धुळे तालुक्यातली पंधरा गावं, शिंदखेडा तालुक्यातील ५, तर जळगाव जिल्ह्यात अमळनेर तालुक्यातल्या सोळा गावांना पिण्याच्या पाण्याची टंचाई जाणवत आहे. त्यामुळे  अक्कलपाडा धरणातून २०० दशलक्ष घनफूट पाणी जिल्हाधिकारी जलज शर्मा यांच्या आदेशानुसार आज पांझरा नदी पात्रात सोडण्यात आलं.

//<><><><><>//